सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

दुरध्वनी क्र. ०२२-२५२२९३०३
Email ID-dcpzone6-mum@mahapolice.gov.in
zone6stat@gmail.com

पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ - १ यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत ४ था माळा , आर.सी. मार्ग, चेंबुर, मुंबई-४०००७१

---

## प्रेस नोट

( दि.०३/०९/२०२६)

(आरसीएफ पोलीस ठाणे)

### धारदार शस्त्राने हल्ला करणा-या आरोपीतास भक्कम पुराव्याच्या आधारे न्यायालयाने ठरविले दोषी

दिनांक ०२/०९/२०२६ रोजी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट क्रंमाक ५२ कुर्ला मुंबई यांनी आरसीएफ पोलीस ठाणे गु.र.क्रं.९३७/२०१६ कलम ३२६, ४५२, ५०४, ५०६(२) भा.दं.वि. अन्वये दाखल गंभीर दुखापतीच्या गुन्हयात आरोपीस भारतीय दंड संहिता कलम ३२६ अन्वये दोषी ठरवुन ०३ वर्षे सक्त कारावास व १० हजार रुपये दंड व दंड न भरल्यास एक महिना कैद प्रमाणे शिक्षा सुनावली आहे.

दिनांक ३१/०५/२०१६ रोजी दुपारी ०२.०० वाजेच्या सुमारास फिर्यादी दिलशाद नबीउल्ला खान हे फेरीवाल्याकडुन कपडे घेत असतांना यातील आरोपी युसुफ नबीलाल शेख वय ३० वर्षे, याने सार्वजनिक नळावर पाणी भरण्याच्या जुना वादावरुन पाठीमागुन येवुन फिर्यादीच्या पाठीच्या डाव्या बाजुस धारदार शस्त्राने चाकुने वार करुन गंभीर दुखापती केले, नमुद गुन्ह्यातील फिर्यादी यांनी आरसीएफ पोलीस ठाणेस तक्रार दिल्यावरुन आरसीएफ पोलीस ठाणे गु.र.नं. ९३७/२०१६ कलम ३२६,४५२,५०४,५६०(२) भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे तपासी अधिकारी  मपोउपनि अश्विनी खांबे व सपोनि सर्जेराव नेटके यांनी केलेला सखोल तपास, सबळ पुराव्यांचे संकलन व त्यांचे योग्य प्रकारे दस्तऐवजीकरण केले, तसेच सरकारी अभियोक्ता सुप्रिया कांबळे यांनी मा.न्यायालयासमोर पुराव्यांचे प्रभावीपणे सादरीकरण व पैरवी अधिकारी पोशि जायगुडे व मोरे यांनी सातत्यपुर्ण व परिणामकारक पैरवी केल्यामुळे आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयाचा फायदा न होता त्यास मा.न्यायालयाने दोषसिध्द केले.

सदरची उल्लेखनिय कामगीरी मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त का. व सु श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनंजय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त पुर्व परिमंडळ ०१ समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त ट्रॉम्बे विभाग प्रमोद कोकाटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि राजदत्त कांबळे, पोहवा औटी, पोशि जायगुडे, पोशि मोरे व पोशि जाधव यांनी केली आहे.

***